मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार, दि. 7 मे 2025 | पान- 1

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 4 महिन्यांत घ्या : सर्वोच्च न्यायालयाचा आदेश





**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यासह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटले की, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची अधिसूचना पुढील ४ आठवड्यात निघाली पाहिजे. यानंतर चार महिन्यांत निवडणुकीची प्रक्रिया संपन्न झाली पाहिजे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिले आहेत.

महाराष्ट्रात पंचायत निवडणुकीतील ओबीसी आरक्षण प्रकरणावर सुनावणी करताना न्या. सूर्यकांत म्हणाले की, देशात आरक्षण हे रेल्वेच्या डब्यासारखे झाले आहे. जे लोक त्यात चढले आहेत, ते दुसऱ्यांना आत येऊ द्यायला तयार नाहीत. याचिकाकर्त्यांतर्फे इंदिरा जयसिंह यांनी सुप्रीम कोर्टाकडे महाराष्ट्रात पंचायत निवडणुका घेण्याची मागणी केली. इंदिरा जयसिंह म्हणाल्या की, निवडून आलेल्या स्थानिक संस्था अस्तित्वात नाहीत, त्यांच्या जागी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्या. सूर्यकांत म्हणाले की, फक्त काही विशिष्ट वर्गांनाच आरक्षण का मिळावे? सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या इतर लोकांना आरक्षण का मिळू नये? यावर विचार करणे ही राज्यांची जबाबदारी आहे, असे न्यायमूर्तींनी म्हटले.

### सर्वोच्च न्यायालय काय म्हणालं?

- स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्या नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या.
- 1994 ते 2022 पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या.
- राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी.
- ओबीसींच्या जागा कमी होत्या हा याचिकाकर्त्यांचा दावा होता, त्यावर कोर्टाने 2022 पूर्वीची स्थिती कायम राहील असे निर्देश दिले.

# कुरव्यात गुंडाला विधानसभा उपाध्यक्षांनी भरवला केक!

## अण्णा बनसोडे यांचा प्रताप : गुंड आक्क्या बॉण्ड वर तब्बल 16 गंभीर गुन्हे दाखल



**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा उपाध्यक्ष पदावर असल्याने आता व्यवस्थित वागले पाहिजे या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सल्ल्याला अण्णा बनसोडे यांनी केराची टोपली दाखवल्याचे समोर आले आहे. अण्णा बनसोडे आणि कुप्रसिद्ध गुन्हेगार आकाश मोहोळ उर्फ आक्या बॉण्ड हे एकमेकांना केक भरवत असल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. तब्बल १६ गंभीर गुन्हे दाखल असणाऱ्या आक्या बॉण्ड याच्यासोबत अण्णा बनसोडे यांनी वाढदिवस साजरा केल्याने चर्चांना उधाण आले आहे.

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा ४ मे रोजी वाढदिवस साजरा झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. मात्र, कुख्यात गुन्हेगार आक्या बॉण्ड हा अण्णा बनसोडे यांच्यासाठी चक्क केक आणि पुष्पगुच्छ घेऊन आला. यावेळी अण्णा बनसोडे आणि आक्या बॉण्ड यांनी एकमेकांना केक भरवत वाढदिवस साजरा केला आणि उपस्थितांच्या भुवया उंचावल्या. आक्या बॉण्ड हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरूद्ध तब्बल १६ गंभीर गुन्हे दाखल आहेत. 'मोक्का' अंतर्गत कारागृहात असणाऱ्या आक्याची नुकतीच जामिनावर सुटका झाली आहे. विधानसभा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अण्णा बनसोडे यांचा नुकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला होता.

यावेळी व्यासपीठावरून बोलताना अजित पवार यांनी अण्णा बनसोडे यांना मोलाचा सल्ला दिला होता. विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांची मुर्ती लहान, पण किर्ती महान आहे, असे कौतुक करतानाच आता सकाळी लवकर कामाला लागा, लोकांना वेळ द्या, विधानसभेला वेळ द्यावा लागेल. जेवढे महत्वाचे पद, तेवढे जास्त कष्ट घ्यावे लागतात. तुमच्या चिरंजीवाला जरा समजावून सांगा. घरातील व्यक्तीने चुकीचे कृत्य केल्यास स्वत:ची, पक्षाची, सरकारची बदनामी होते, असा सल्ला देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बनसोडे यांचे कान टोचले होते. मात्र, अजितदादांनी दिलेल्या या मोलाच्या सल्ल्याचा अण्णा बनसोडे यांना आपल्या वाढदिवसा दिवशीच विसर पडला. वाढदिवसानिमित्त कुप्रसिद्ध गुन्हेगाराला केक भरवल्याचा आणि त्याच्याकडून केक खाल्ल्याचा फोटो व्हायरल झाल्याने शहरात चर्चा रंगली आहे.

# पुणे विभागात पुण्याचीच बाजी!

## जिल्ह्याचा सर्वाधिक 94.87 टक्के निकाल : नगरचा निकाल 86.34 टक्के

**पुणे | प्रतिनिधी**

बारावीच्या निकालात पुणे विभागामध्ये पुणे जिल्ह्यानेच बाजी मारल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. पुणे विभागाचा एकत्रित निकाल ९१.३२ टक्के लागला असून, यात पुणे जिल्हा सर्वाधिक ९४.८७ टक्के, तर त्याखालोखाल सोलापूर जिल्हा ८८.६२ टक्के आणि सर्वात कमी अहिल्यानगर जिल्ह्याचा निकाल ८६.३४ टक्के लागला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत पुणे विभागाच्या निकालात यंदा ३ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे.



### राज्याच्या तुलनेत विभागाची घसरण

» राज्याच्या एकूण निकालाचा विभागनिहाय विचार करता पुणे विभाग सहाव्या स्थानी आहे. गतवर्षी पुणे विभागाने तिसरे स्थान पटकावले होते. दरवर्षीच्या निकालात कोकण विभाग प्रथम स्थानावर असतो. पुणे विभागात येणाऱ्या तिन्ही जिल्ह्याचा निकाल यंदा घटला आहे.

### शाखानिहाय स्थिती

- विज्ञान शाखेचा सर्वाधिक ९७.०१ टक्के
- वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ९२.३२ टक्के
- कला शाखेचा एकूण निकाल ७४.२४ टक्के
- व्यावसायिक अभ्यासक्रम शाखेचा एकूण निकाल ८४.१५ टक्के
- तंत्रविज्ञान शाखेचा निकाल ७२.०३ टक्के

पुणे विभागात एकूण २ लाख ४४ हजार २९४ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी २ लाख ४२ हजार ६७१ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यातील २ लाख २१ हजार ६३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी विभागाचा निकाल ९४.४४ टक्के लागला होता. यंदाचा निकाल ९१.३२ टक्के लागला आहे. गतवर्षीही पुणे जिल्हा अव्वल स्थानी होता.

गतवर्षी पुणे जिल्ह्याचा निकाल ९५.१९ टक्के, अहिल्यानगर जिल्ह्याचा निकाल ९३.४० टक्के आणि सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९३.८८ टक्के लागला होता. यावरून विभागातील तिन्ही जिल्ह्यांच्या निकालात घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. गैरमार्ग प्रकरणांची संख्या घटल्याचेही आकडेवारीतून समोर आले आहे. गतवर्षी ९५ प्रकरणांची नोंद झाली होती, ती यंदा ६६ वर आली आहे.

### जिल्हानिहाय चित्र

१) पुणे : पुणे जिल्ह्यात यंदा बारावीसाठी १ लाख २७ हजार ९६४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १ लाख २७ हजार ३८७ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यातील १ लाख २० हजार ८५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाची एकूण टक्केवारी ९४.८७ इतकी आहे.

२) अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्ह्यात ६१ हजार ४५५ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी ६० हजार ९३१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यातील ५२ हजार ६०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाची एकूण टक्केवारी ८६.३४ इतकी आहे.

३) सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात यंदा बारावी परीक्षेसाठी एकूण ५४ हजार ८७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५४ हजार ३५३ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यातील ४८ हजार १६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, निकालाची एकूण टक्केवारी ८८.३२ इतकी आहे.

मुला-मुलींचे प्रमाण काय?

- पुणे जिल्ह्यात मुलींचा निकाल ९६.७४ टक्के, तर मुलांचा निकाल ९३.१५ टक्के लागला.

- अहिल्यानगर जिल्ह्यात मुलींचा निकाल ९२.५१ टक्के, तर मुलांचा निकाल ८१.४० टक्के लागला.

- सोलापूर जिल्ह्यात मुलींचा निकाल ९६.६२ टक्के, तर मुलांचा निकाल ८४.६४ टक्के लागला.

# पाणीकपातीच्या निर्णयाचा फेर आढावा

## महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या पाणीपुरवठा विभागाला सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने दक्षिण पुण्यातील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी एक दिवस वेगवेगळ्या भागांतील पाणी आठवड्यातून एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी आठवडाभर करून परिस्थितीचा फेरआढावा घ्या, त्यानुसार पाणीकपात सुरू ठेवायची, की रद्द करायची याचा निर्णय घ्या, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पाणीपुरवठा विभागाला सोमवारी दिल्या.

वडगाव जलशुद्धीकरण केंद्रातून पाणीपुरवठा होणाऱ्या सिंहगड रस्ता, कात्रज, कोंढवा भागात चक्राकार पद्धतीने आठवड्यातील एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. याची अंमलबजावणी सोमवारपासून झाली. धनकवडी, बालाजीनगर, आंबेगाव पठार, धायरी, सनसिटी, वडगाव बुद्रुक, हिंगणे, सहकारनगर, दत्तनगर, संतोषनगर, भारती विद्यापीठ परिसर, आगम मंदिर, कात्रज, कोंढवा बुद्रुक या परिसरामध्ये हा निर्णय लागू आहे.



शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणात पुरेसा पाणीसाठा असतानाही केवळ नियोजनाचा अभाव आणि वितरणातील त्रुटींमुळे महापालिकेने ही पाणीकपात लागू केल्याचा आरोप केला जात आहे. या भागातील नागरिकांकडूनदेखील पाणीकपातीस विरोध होत आहे. एक दिवस पाणी बंद ठेवल्यानंतर त्याचा दुष्परिणाम पुढील दोन ते तीन दिवस होतो.

'शहरासाठी पुरेसे पाणी उपलब्ध आहे. पाण्याची मागणी वाढली असेल अथवा पुरवठा विस्कळीत झाला असल्यास प्रशासनाने पाणीपुरवठा सुरळीत करावा. मात्र, कपात करणे योग्य नाही. आठवडाभर या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यानंतर याचा पुन्हा आढावा घेऊन निर्णय घ्यावा,' अशा सूचना आयुक्त डॉ. भोसले यांनी पाणीपुरवठा विभागाला केल्या आहेत.

# शहरातील बारावीचा निकाल 96.55 टक्के

## 29 कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल 100 टक्के : गेल्या वर्षीच्या तुलनेत निकालात 0.9 टक्क्यांनी घट

**पिंपरी | प्रतिनिधी**

बारावीचा निकाल सोमवारी (ता. ५) दुपारी एकला जाहीर झाला अन् विद्यार्थ्यांची धाकधूक संपली. शहरात बारावीचा निकाल ९६.५५ टक्के लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत निकालात ०.९ टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येत आहे.

यावर्षी ९ हजार ४८४ मुले उत्तीर्ण झाले. तुलनेत ८ हजार ५९६ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. यंदा २९ शाळांचा शंभर टक्के निकाल लागला, तर दुसरीकडे चिंचवडमधील चिंतामणी रात्रप्रशाला ज्युनिअर कॉलेजने सर्वाधिक कमी ४४. ४४ टक्के मिळवले आहेत. पुर्नपरीक्षार्थ्यांचा (रिपीटर) ७१.२३ टक्के निकाल लागला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातून १८ हजार ८०३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यात ९ हजार ९७९ मुले आणि ८ हजार ८२४ मुलींचा समावेश होता. ९ हजार ९३३ मुले, ८ हजार ७९२ मुली असे एकूण १८ हजार ७२५ विद्यार्थांनी परीक्षा दिली. त्यापैकी ९ हजार ४८४ मुले आणि ८ हजार ५९६ मुली असे मिळून १८ हजार ८० परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात ९५.४७ टक्के मुले, तर ९७.७७ टक्के मुलींनी बाजी मारली आहे.

### निकाल स्क्रीनवर पाहण्याची सोय

» निकाल पाहण्यासाठी शहरातील काही शाळांमध्ये स्क्रीनवर पाहण्याची सोय केली होती. निकाल पाहताच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जल्लोष सुरू केला अन् सगळीकडे एकच जोश निर्माण झाला. हसरे चेहरे आणि आनंदी चेहऱ्यांनी महाविद्यालयाचे कॅम्पस फुलून गेले होते. एकूणच यंदाच्या निकालामुळे सगळ्याच महाविद्यालयात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. दरम्यान, तब्बल तीन तास शिक्षण मंडळाचे संकेतस्थळ हँग असल्यामुळे निकाल पाहण्यास अडचण निर्माण झाली होती.

### रिपिटरचा टक्का घसरला

» गेल्यावर्षी रिपीटर विद्यार्थ्यांचा ७५.०९ टक्के निकाल लागला होता. यावर्षी त्यांचा ७१.२३ टक्के निकाल लागला आहे. यात १ हजार ३३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ८३० मुले आणि ५०१ मुलींचा समावेश होता. ८१८ मुले आणि ४९६ मुली असे एकूण १ हजार ३१४ विद्यार्थांनी परीक्षा दिली. त्यापैकी ५७४ मुले आणि ३६२ मुली असे एकूण ९३६ पुर्नपरीक्षार्थी पास झाले आहेत. ७०.१७ टक्के मुले आणि ७२.९८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आप व उबाठा शिवसेनेला मोठे खिंडार!

## महापालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजप शहराध्यक्ष आमदार जगताप यांचे 'धक्का तंत्र'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून आम आदमी पक्षाचे माजी शहराध्यक्ष आणि पदवीधर आघाडीचे प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे यांच्यासह 'आप' आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) विभाग प्रमुख प्रदीप महाजन यांच्यासह दोन्ही पक्षांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते भारतीय जनता पक्षात (भाजप) दाखल झाले आहेत.



या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार महेश लांडगे, आमदार राहुल कुल, आमदार हेमंत रासने, आमदार उमा खापरे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवी अनासपुरे, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे, शरद बुट्टे पाटील, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवसेना (उबाठा) गटातून भाजपमध्ये प्रवेश केलेले प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते पुढीलप्रमाणे..

प्रदीप महाजन, देवानंद कापरे, अमोल बोंबले, सुनील साबळे, स्वप्नील ढोमसे, महेश देबडवार, प्रशांत कोतूर, रवी अंबाडकर, आशिष यादव, संजय अंबाडकर, अतुल देवाडीकर, संजय कुलकर्णी, जालिंदर झिंजुरके, मनीष आढाव, अशोक मामीडवार, विवेक मामीडवार, कल्पेश मद्रेवार, अविनाश देवशेटवार, अनिल देवशेटवार, संतोष नलदकर, संतोष गादेवार, दत्ता कामठाणे, कमलेश बंडेवार, संजय वट्टमवार, डॉ. गिरीश गंधेवार, व्यंकटेश महाजन, ज्ञानेश मानकुलवार, नितीन अंजीकर, नितीन भावटणकर, लक्ष्मीकांत कोले, सुनील मरुडवार, राहुल डाचावार, श्रीस्वरूप जोशी, अनिल राठी, डॉ. प्रशांत देशमुख, अवताडे, विजय शहाणे, राजेश घुंगाडे, संदीप अर्थमवार, नरेश कोटगिरे, प्रणिता मद्रेवार, दीपा कामठाणे, सुप्रिया देवशेटवार, अपर्णा देबडवार, गीता कोट्टर, प्रथम महाजन, निखिल शहाणे, अजय पाटील, उज्वला महाजन, प्रशांत देशपांडे.

या पक्षप्रवेशामुळे पिंपरी-चिंचवड परिसरातील आम आदमी पार्टी आणि शिवसेना (उबाठा) गटाला मोठा फटका बसला असून, शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या संघटनात्मक बळात वाढ झाली आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपची ताकद वाढवण्यासाठी ही भर महत्त्वाची ठरणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

### 'आप'मधून भाजपमध्ये प्रवेश केलेले पदाधिकारी व कार्यकर्ते पुढीलप्रमाणे..

» चेतन बेंद्रे, नारायण भोसले, प्रकाश परदेशी, अरुणा सीलम, दत्तात्रय काळजे, जयदीप सूर्यवंशी, कुणाल वाकटे, धनंजय पिसाळ, सुखदेव कराळे, शुभम यादव, अशुतोष शेलके, अतुल ठाकरे, वैभव पाटणकर, नितीश काळे, हरीश जाधव, अक्षय गावंडे, विनील देवरे, सोहन नन्हकडे, महेंद्र नागवडे, विपुल घोलप, राहुल नाईक, किरण उघळे, सागर वाघमारे, रुपेश महाडिक, प्रसाद मोरे, श्रीराज पठाण, थोंबरे, गंगा चौधरी, रमेश बन्सोड, सोनार, संकते भोसले, हार्दिक गायकवाड, आरजे जाधव, मनोहर चिकले, मोहन जाधव, जनार्दन कदम, सर्जेराव देखणे, सुमित राक्षे, ठकसेन निकम, अथर्व धावळे, ओम पवार, महेश काळे, सुने बोडारे, यशोधन देशमुख, अर्पित सुतार, विशाल डोंगरे, मोसिन गडकन, सूरज बन्सोडे, शिवकुमार गुप्ता, शंकर बाबू, स्वप्नील बेंद्रे, संदीप काशीद, सचिन नागवाड, सतीश सीलम, रामकृष्ण सीलम, प्रकाश तिर्खुंडे.

# रामवाडीतील रस्त्याचे धोकादायक डांबरीकरण

## मोहन देवकर चौक ते लोकमान्य टिळक प्राथमिक विद्यालयापर्यंतचा रस्ता ओबडधोबड

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नगर रस्त्यावर रामवाडी गावठाणात पुणे महापालिकेने मोहन रामचंद्र देवकर (पाटील) चौक ते लोकमान्य टिळक प्राथमिक विद्यालयापर्यंत डांबरीकरण केले आहे. हे घाईगडबडीत केल्यामुळे रस्ता ओबडधोबड झाला असून, ठिकठिकाणी रस्त्यावर इंचाइंचावर टेंगळं तयार झाली आहेत. हा रस्ता धोकादायक झाला असून यामुळे जिवघेणे अपघात होण्याची शक्यता आहे.

रामवाडी गावठाणामधील मुख्य रस्ता असून, याच रस्त्यावर लोकमान्य टिळक प्राथमिक विद्यालय असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, पालक-विद्यार्थी आणि वाहनचालकांची नेहमी वर्दळ असते. हाडे मोडून घेणारा पालिकेने रस्ता तयार केल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे. पालिकेच्या पथ विभागाकडून शहरातील विविध भागातील रस्त्यांचे डांबरीकरण केले जात आहे. मात्र, हे काम करताना दर्जा राखला जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जाऊ लागला आहे.



रामवाडी गावठाणात चुकीच्या पध्दतीने डांबरीकरण केले असून ते तातडीने काढून घेण्यात यावे. तसेच तातडीने नवीन डांबरीकरण करण्यास सांगावे. निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे संबंधित ठेकेदारावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणीदेखील नागरिकांनी केली आहे. याबाबतचे स्मरणपत्र पथ विभागाला देऊन सुद्धा त्यावर अद्याप कार्यवाही केली नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

> रामवाडी गावठाणात पालिकेने रस्त्यावर नव्याने डांबरीकरण केले आहे. मात्र, हे काम करताना ठेकेदाराने डोळे झाकून काम केले आहे की काय, असा संशय येत आहे. केवळ रस्ता काळा करण्याचे काम ठेकेदाराने केले आहे. डांबरीकरण केल्यानंतर गाड्या सुसाट पळणे अपेक्षित असते. मात्र, आता अपघात होणारे डांबरीकरण केल्यामुळे वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पुन्हा डांबरीकरण करून रस्ता चकचकीत करावा.
> **- प्रमोद देवकर-पाटील, सामाजिक कार्यकर्ते.**

### येरवडा ते मुंढवा पुलापर्यंतच्या नदीकाठचा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करा

पुणे-नगर रस्त्यावर शास्त्रीनगर चौकात उड्डाण पूल आणि भुयारी मार्गाचे काम सुरू करण्यात आले आहे. नगर रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत असते. त्यात आता शास्त्रीनगर चौकात उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाच्या कामांमुळे वाहतूक कोंडीत अजूनच भर पडणार आहे. शास्त्रीनगर चौकातील कामामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीला पर्यायी रस्ता म्हणून येरवडा ते मुंढवा पुलापर्यंतचा नदीकाठीचा अपूर्ण रस्ता तातडीने पूर्ण केल्यास रामवाडी, कल्याणीनगर आणि वडगावशेरी आदी भागातील नागरिकांना वाहतुकीसाठी रस्त्याचा वापर करता येईल. शास्त्रीनगर चौकातील वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे येरवडा ते मुंढवा पुलापर्यंतच्या नदीकाठीच्या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी करणारे निवेदन आयुक्तांना देवकर-पाटील यांनी दिले आहे.

# कात्रज परिसरातील कचरा डेपोत आग

## रात्री उशीरापर्यंत अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज परिसरातील गुजरवाडी भागात असलेल्या कचरा डेपोला रविवारी दुपारी साडेचारच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. कचऱ्याने पेट घेतल्यानंतर आग पसरली. रात्री उशीरापर्यंत अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

गुजरवाडीतील मोकळ्या जागेत तोडलेले झाडे तसेच पालापाचोळा टाकून दिला जातो. रविवारी दुपारी पालापाचोळ्याला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाच्या कात्रज केंद्राला मिळाली.या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे तीन बंब घटनास्थळी दाखल झाले. सुका कचरा असल्याने आग भडकली. आग इतरत्र पसरण्याची शक्यता होती. त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जवानांकडून प्रयत्न सुरू करण्यात आले.तेथे असलेले पोकलेन यंत्रण,अन्य साहित्य बाहेर काढले. पालपाचोळ, तसेच सुका कचरा पेटल्याने मोठ्या प्रमाणावर धूर झाला. त्यामुळे आग आटोक्यात आणताना अडचण आली.सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.



पालपाचोळा पुन्हा पेटण्याची शक्यता होती, तसेच आग धुमसत होती. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. केंद्रप्रमुख गणेश भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली आग आटोक्यात आणण्याचे काम रात्री उशीरापर्यंत सुरू होते.

### महंमदवाडीत सदनिकेत आग

**» हडपसर भागातील महंमदवाडीतील एका सोसायटीत सहाव्या मजल्यावर असलेल्या सदनिकेत आग लागल्याची घटना रविवारी दुपारी घडली.आग पसरल्याने सिलिंडरचा स्फोट झाला.त्या वेळी सदनिकेत सहाजण होते.आग लागल्याची माहिती मिळताच ते सदनिकेतू बाहेर पळाल्याने बचावले.या घटनेची माहिती मिळताच आग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. पाण्याचा मारा करुन दहा ते पंधरा मिनिटांत आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.आगीमागचे कारण समजू शकले नाही,अशी माहिती अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी दिली.**